अतिक्रमण हटाव मोहिमेच्या विरोधात व्यावसायिकांचे बेमुदत साखळी उपोषण
>> पान 2

'महाज्ञानदीप' ऑनलाईन पोर्टलचा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते शुभारंभ
>> पान 3

मनमानी न करता जनतेचे मत विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागेल
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



सई ताम्हणकर म्हणतेय, आलेच मी...; देवमाणूसमध्ये लटक्या-झटक्यांनी गाजवणार लावणीचा फड
आतील पान

**सुविचार**
दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद शोधा.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 244 ■ गुरुवार, दि. 17 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्यपाल भवनाच्या जागेवर शिवस्मारक बांधा

## राज्यपालांना मंत्र्यांच्या बंगल्यात हलवा, उद्धव ठाकरेंनी केले उदयराजेंच्या मागणीचे समर्थन

दैनिक आपला विदर्भ

मुंबई/प्रतिनिधी :रायगडवर बोलताना अमित शाहांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केला, त्यांनी आम्हाला शिवरायांबद्दल सांगू नये असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्यांना सोडणार नाही असं म्हणणाऱ्या देवेंद्र फडणवीस त्यावर गप्प बसून होते असंही उद्धव ठाकरे म्हणाले. सत्ता नसताना जे सोबती आहेत तेच निष्ठावान आहेत. बाळासाहेबांनी माझ्या पाठीशी पुण्याई उभी केली. त्यामुळे मला सत्तेची गरज नाही असंही उद्धव ठाकरे म्हणाले. ते नाशिकच्या शिवसेना निर्धार मेळाव्यात बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले की, चार दिवसांपूर्वी अमित शाह रायगडवर आले आणि त्यांचा एकेरी उल्लेख करत म्हणाले की, शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापुरते सीमीत ठेऊ नका. पण शिवाजी महाराजांनी ज्यावेळी सूरत लुटली त्यावेळी त्याची बातमी ही लंडन गॅझेटमध्ये छापून आली होती. त्यामुळे अमित शाहांनी आम्हाला शिवरायांबद्दल सांगू नये.

भाजपला शिवाजी महाराजांबद्दल एवढंच वाटत असेल तर त्यांनी शिवजयंतीला देशभरात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावा असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिलं. शिवाजी महाराजांबद्दल भाजपची भूमिका ढोंगी असल्याची टीका करत अरबी समुद्रातील शिवस्मारक कधी होणार असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी केला. ते म्हणाले की, नरेंद्र मोदी आले आणि त्यांनी समुद्रात भूमिपूजनाचा कार्यक्रम केला. त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असल्याने आम्हालाही वाटत होतं की स्मारक होईल. शिवाजी महाराजांपेक्ष्या मोठे कोणाच असू शकत नाही. उदयनराजे म्हणाले की, राज्यपाल भवनमध्ये शिवाजी महाराजांचे स्मारक बांधा. शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक करा.



उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवसेनेने हिंदुत्व सोडलं अशी बोंब मारणाऱ्या भाजपने बिहारमध्ये 'सौगात ए मोदी'च्या माध्यमातून ३२ लाख मुस्लिमांना भेटीचं वाटप केलं. त्यावेळी तुमचं हिंदुत्व कुठे गेलं? म्हणजे महाराष्ट्रामध्ये बटेंगे तो कटेंगे आणि बिहारमध्ये बाटेंगे तो जितेंगे असं यांचं धोरण. मी मुख्यमंत्री असताना कसलाही भेदभाव केला नाही. मी केलेल्या कामांमुळे मुस्लिम लोक माझ्यासोबत आले आणि हे घाबरले. भारतीय जनता पक्ष हा फेक नरेटीव्हवाला पक्ष आहे अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. बिहारमध्ये यांनी नितीश कुमार यांच्यासोबत हे गेले. आंध्रमध्ये चंद्राबाबूसोबत हे गेले. त्यामुळे आम्ही भाजपला सोडलं आहे, हिंदुत्वाला नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरेंच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

हिंदुत्व जपणारा हा महाराष्ट्र धर्म आहे. आम्ही जय श्रीराम बोलणार, पण तुम्हाला जय शिवराय बोलावे लागेल.

आम्हा वक्फ बोर्ड विधेयकाला विरोध केला. कारण त्याचा हिंदुंशी कोणताही संबंध नव्हता. वक्फ बोर्डच्या विधेयकाला तामिळनाडूच्या अण्णा द्रमुकने विरोध केला. पण दोनच दिवसात अमित शाहा तामिळनाडूत गेले आणि त्यांनी त्यांच्याशी युती केली. कारण तिकडे स्टॅलिन त्यांच्या बोकांडी बसला आहे. भाजपवाले चंद्राबाबू, नितीश कुमार, मेहबुबा मुफ्ती यांच्यासोबत बसले होते. यांचे हिंदुत्व बुरसटलेले आहे. शेतात बैल लघु शंका करायला जातो तसे वाकडे नका जाऊ, सरळ जा. आम्ही पाकिस्तानमध्ये जाऊन नवाज शरीफच्या वाढदिवसाचा केक कापून आलो नाही.

## दंगलींच्या आडून महाराष्ट्र लुटण्याचे षडयंत्र; राज्यात शांतता नांदावी यासाठी सद्भावना यात्रेची गरज

नागपूर/प्रतिनिधी : दंगलींच्या आडून महाराष्ट्र लुटण्याचे षडयंत्र, राज्यात शांतता नांदावी यासाठी सद्भावना यात्रेची गरज आहे असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज नागपूरमध्ये काँग्रेसने आयोजित केलेल्या सद्भावना शांती मार्चवेळी व्यक्त केले. नागपूर शहरात सामाजिक सौहार्द व शांतता नांदावी यासाठी काँग्रेसने सद्भावना शांती मार्च काढला. आजच्या पदयात्रेत दीक्षाभूमी, ताजुद्दीन बाबा व टेकडी गणेश मंदिरात दर्शन घेऊन सद्भावनेचे साकडे घालण्यात आले. या मोर्चात प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, नागपुरात झालेल्या हिंसाचारावेळी मुख्यमंत्री पोलिसांना फोन करत होते पण पोलिस फोन उचलत नव्हते असे भाजपा आमदार सांगत होते, यातून दंगलीचे प्रायोजक कोण होते हे वेगळे सांगण्याची गरज नाही. राज्य टिकण्यासाठी दंगली घडवल्या जात आहेत व या दंगलींच्या आडून महाराष्ट्र लुटला जात आहे.






शिंदी गावातील भीषण पाणी टंचाई महिलांच्या डोक्यावर हंडे...

# घाटावरील तालुक्यांना पाणीटंचाईच्या झळा

■ नागरिक त्रस्त अधिकारी दिशाभूल करणारी माहिती देऊन मस्त ■ मेहकर तालुका डेंजर झोनमध्ये ■ पाणीपुरवठा योजना ठरल्या कुचकामी

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्याला ऐतिहासिक धार्मिक असा वारसा लाभलेला आहे. राज्याच्या नकाशावर जिल्ह्याची वेगळी ओळख असली तरी, विकासाच्या बाबतीत जिल्ह्याची गती कायम मंदावलेलीच राहिलेली आहे. एवढेच नव्हे तर, पायाभूत सुविधा आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधेपासून बुलढाण्यातील अर्धा अधिक भाग कायम भीषण पाणीटंचाईग्रस्त राहिलेला आहे. पाणीटंचाईच्या सर्वाधिक झळा घाटावरील मेहकर,बुलढाणा, देऊळगाव राजा, चिखली, सिंदखेडराजा, लोणार या तालुक्यांना सहन कराव्या लागत आहेत. मेहकर तालुका तर पाणीटंचाईच्या बाबतीत डेंजर झोन मध्ये आहे.

शासन प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे बुलढाणा जिल्ह्यात पाणीटंचाईची वर्षानुवर्षापासून कायम आहे.जिल्हा प्रशासनाने संभाव्य टंचाईग्रस्त गावांमधील उपाययोजनांसाठी कृती आराखडा तयार केला आहे. सद्यस्थितीत १,३३४ गावापैकी १६८ उपाययोजनांना मंजुरी मिळाली. विंधन विहिरी, कूपनलिका घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती, विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पूरक नळ योजना, टँकरने पाणीपुरवठा, खासगी विहीर अधिग्रहण, बुडक्या घेणे, विहिरी खोलीकरण, गाळ काढणे, प्रगतिपथावरील पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे अशी कामे केली जात आहेत. येत्या काळात १,१४५ गावांमध्ये टंचाई परिस्थिती उद्भवण्याची शक्यता लक्षात घेता उपायांची तयारी सुरू असल्याची माहिती आहे.मेहकर तालुक्यामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. मेहकर तालुक्यात पार्डी, जवळा, हिवरा साबळे, वरवंड, बोथा, उटी, पाथर्डी; बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई, सैलानी, ढासाळवाडी, पिंपरखेड, देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा, निमखेड, कुंभारी, सावखेड नागरे; चिखली तालुक्यातील भालगाव, श्रीकृष्णनगर, कोलारा आणि सिंदखेड राजा तालुक्यातील सावरगाव माळ व पांग्री उगले या गावांमध्ये टँकर द्वारे नागरिकांची तहान भागविली जात आहे. घाटाखाली नळ योजनांमुळे फारशी पाणीटंचाई जाणवत नसल्याचे चित्र सध्यातरी दिसून येत आहे.मेहकर तालुक्यांमध्ये जवळपास ९२ गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करू कामे करण्यात आली आहेत. मात्र, सदर काम पूर्णत्वास न झाल्यामुळे मेहकर तालुक्यातील बहुतांश गावात भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. जल जीवन मिशन योजनेचे काम वेळेत पूर्ण झाले असते तर, आज तालुक्यातील अर्ध्यापेक्षा जास्त गावातील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी निकाली निघाली असती. मात्र, शासन प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे तालुक्यातील पाणीटंचाई कायम राहिली आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक



## शिंदी गावात भीषण पाणीटंचाई

मागील १५ वर्षांपासून गावात पाणीच नाही पाण्यासाठी महिलाना एक ते दीड किलोमीटर करावी लागते पायपीट बुलढाणा जिल्ह्यातील शिंदी येथे भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून गावातील महिलांना पाण्यासाठी गावाबाहेरील शेतात असलेल्या विहिरीवर एक ते दीड किलोमीटरा पायपीट करत जावे लागत आहे. यामुळे मजुरी सुधा बुडत आहे. मागील १५ वर्षांपासून नळाला सुद्धा पाणी मिळत नसल्याने ३०० ते ४०० रुपये टँकर प्रमाणे पाणी विकत घ्यावे लागत आहे. गावात कोट्यवधी रुपयांच्या दोन योजना मंजूर झाल्या, त्याचे कामही अर्धवट आहेत.त्यामुळे आता भर उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण भटकंती करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. आम्हाला फक्त पाणी द्या, अशी म्हणण्याची वेळ आता ग्रामस्थांवर आली आहे.

## ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग अधिकाऱ्याकडून योजना पूर्ण झाल्याचे खोटी माहिती

मेहकर तालुक्यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत ९२ ग्रामपंचायत अंतर्गत जलजींचे काम अर्धवट अवस्थेत आहे.मात्र, संबंधित अधिकारी यांनी सहा योजने हा पूर्णत्वास गेल्या असून त्या ठिकाणी शंभर टक्के काम पुर्ण झाल्याची माहिती आमसभेत दिली. मात्र प्रत्यक्षात या सहा गावांपैकी वरुड या गावांमध्ये जवळपास ३० ते ४० टक्के काम अपूर्ण असल्याचे येथील नागरिक व सरपंच यांनी सांगितले आहे. त्यामुळे मेहकर येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील उपविभागीय अभियंता यांच्यावर मोठा रोष व्यक्त केला जात आहे व त्यांनी खोटी माहिती का दिली असा प्रश्नही आता वरुड येथील गावकरी यांनी उपस्थित करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी,अशी मागणी सुद्धा केली जात आहे.

## मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीपेक्षा अधिक ( १०५ ) टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी अधिक तफावतीची शक्यता गृहीत धरण्यात आली आहे याचाच अर्थ यावर्षी १०० ते ११० टक्के पावसाची शक्यता आहे. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर वरुण राजाची कृपा राहणार असून कायम दुष्काळग्रस्त असणाऱ्या मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण अधिक असण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजाने राज्यातील बळीराजा सुखावला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे. कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळसदृश परिस्थिती होती त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्ष देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच मागील दोन वर्ष देशात आणि राज्यातील काही भागात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडला असला तरी राज्यातील काही भागात दुष्काळसदृशच परिस्थिती होती. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हंड्यासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरातही काही भागात टँकर चालू आहे. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.

# अतिक्रमण हटाव मोहिमेच्या विरोधात व्यावसायिकांचे बेमुदत साखळी उपोषण

■ राजकीय सोडबुद्धीतून गोरगरिबांचे हातचा घास हिरावून घेऊ नका
■ किशोर गारोळे यांचे भावनिक आवाहन ■ मेहकर नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरातील हुकूमशाही पध्दतीने सुरु असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिम विरोधात व इतर मागण्या मंजूर कराव्या यासाठी अतिक्रमणधारकांनी १६ एप्रिलपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे.

अतिक्रमणासंदर्भात शहरातील अतिक्रमणधारकांनी, मेहकर नगर परिषद मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नगरपरिषदेने कोणतीही लेखी नोटीस न देता तसेच कोणताही मुदतकाल न देता डोणगाव रोड, जानेफळ रोड, बसस्थानक रोड, राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते महादेव वेटाळ या मार्गावरील रस्त्यालगतचे अतिक्रमण चुकीच्या व हुकूमशाही पध्दतीने हटविण्याचे काम सुरु केले आहे. तसेच मालकीची पक्के बांधकाम असलेली घरे, कॉम्प्लेक्स, खाली प्लॉट यामध्ये नगरपरिषदेने चुकीच्या पध्दतीने मार्किंग केलेली आहे. या कारवाईमुळे अनेकांचे व्यवसाय अचानक बंद पडल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले असून लघू उद्योजकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांच्या भवितव्याचा विचार न





### राजकीय सोडबुद्धीतून गोरगरिबांचे हातचा घास हिरावून घेऊ नका : किशोर गारोळे यांचे भावनिक आवाहन

**मेहकर :** राजकीय सूडबुद्धीने मेहकर शहरातील काढले जात आहे. सदर अतिक्रमण हटाव मोहीम ही माझे अतिक्रमण हटवण्यासाठी राबविण्यात येत आहे अशीही चर्चा आहे.माझे अतिक्रमण पाडायचे असेल. तर पाडा. मात्र मेहकर वासीयांवरिल कारवाई थांबवा. असे भावनिक आवाहन किशोर गारोळे यांनी विरोधकांना केले.मेहकर शहरातील हुकुमशाही पद्धतीने सुरू असलेले अतिक्रमण हटाव मोहीम विरोधात व्यवसायिकांचे बेमुदत साखळी पोषण सुरू केले.मेहकर नगरपरिषदने कोणतेही लेखी नोटीस न देता तसेच कोणत्याही मुद्दतकाल न देता डोणगाव रोड, जानेफळ रोड, बस स्थानक रोड, राजमाता जिजाऊ चौक ते महादेव वेटाळ या मार्गावरील रस्त्यालगचे अतिक्रम चुकीच्या व हुकूमशाही पद्धतीने हटवण्याचे काम सुरू केले आहे. प्रकरणी मेहकर नगर परिषद समोर व्यावसायिकांनी बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. यावेळी आपले मत व्यक्त करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहराध्यक्ष किशोर गारोळे यांनी केले.

करता सुरू केलेली ही अन्यायकारक मोहीम तात्काळ थांबवावी, तसेच संपूर्ण मेहकर शहरातील लघु उद्योजकांचे व्यवसाय अतिक्रमण म्हणून पाहण्याऐवजी, त्यांना शासकीय धोरणाअंतर्गत भाडेपट्टीवर नियमित करावे, ज्या ठिकाणी व्यवसाय सुरक्षितपणे रस्त्याच्या शिस्तीत राहून चालू आहेत, त्यांना कोणताही त्रास किंवा विस्थापन होवू नये, लघू उद्योजक, बेरोजगार युवक व महिला उद्योजिकांसाठी स्वतंत्र व्यवसाय झोन किंवा स्टॉल मार्केट विकसीत करण्यात यावे, शासनाने राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर दरम्यानचा परिसर, बसस्थानक लगतचा परिसर, जानेफळ रोडवरील काही परिसर व शहरातील इतर परिसरातील नजुल जमीन, लघू उद्योजक व बरोजगारांना उपलब्ध करुन दिली होती, ती पूर्ववत करण्यात यावी. वर्षानुवर्षे व्यवसाय करीत असलेल्या लघू उद्योजकांना पर्यायी जागा उपलब्ध करुन दिल्याशिवाय त्यांची दुकाने हटवू नये, नगरपरिषदेने चुकीच्या पध्दतीने मार्किंग करुन नागरिकांच्या मालकीची पक्के बांधकाम असलेली घरे, कॉम्प्लेक्स, खाली प्लॉट हटविण्यापूर्वी त्यांना विश्वासात घेवून त्यांना योग्य मोबदला द्यावा.या मागणीसाठी अतिक्रमण व्यवसायिकांनी १६ एप्रिलपासून नगरपालिका कार्यालयासमोरील बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे.

सदर निवेदनाच्या प्रतिलीपी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, आमदार. सिध्दार्थ खरात,बुलढाणा जिल्हाधिकारी, बुलडाणा जिल्हा पोलिस अधीक्षक, मेहकर उपविभागीय पोलीस अधिकारी, मेहकर पोलीस स्टेशन ठाणेदार, मेहकर तहसिलदार, मेहकर उपविभागीय अधिकारी, मेहकर. रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता यांना दिल्या आहेत.

# राज्यातील सगळे इतिहासकार शरद पवारांच्या बाजूचे, पवारांच्या जवळच्या संघटना ऐतिहासिक विषय उकरुन काढतात: गोपीचंद पडळकर

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** किल्ले रायगडावरील वाघ्या कुर्त्याच्या समाधीची सुरक्षा वाढवली पाहिजे. याठिकाणी आणखी २० पोलीस सुरक्षेसाठी तैनात केले पाहिजेत. संभाजी ब्रिगेडन टोकाची भूमिका मांडते. २०१२ साली असाच काहीसा प्रयत्न झाला होता. वाघ्या कुर्त्याच्या समाधीबाबत राज्य सरकारने ठाम भूमिका घेतली पाहिजे, असे वक्तव्य आमदार गोपीचंद पडळकर यांनी व्यक्त केले. ते बुधवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार यांच्यावरही टीकास्त्र सोडले.



उदयनराजे यांच्याबद्दल नितांत आदर आहे, हे खुसपट ब्रिगेडने काढले आहेत. शरद पवारांना फॉर असलेल्या या संघटना विषय बाहेर काढतात. सगळे इतिहासकार पवार साहेबांना फॉर आहेत. शरद पवारांनी (एप्रीर् इरैरी) फावल्या वेळेत नवा इतिहास लिहावा. एकदाच नवीन इतिहास लिहा, म्हणजे पुढच्या पिढ्यांना परत इतिहास लिहण्याची गरज नाही, अशी खोचक टिप्पणी गोपीचंद पडळकर यांनी केली. तसेच पडळकर यांनी महात्मा फुले यांच्या आयुष्यावर आधारित चित्रपटावरुन सुरु असलेल्या वादावरही प्रतिक्रिया दिली. जात बघून इतिहास काढायचा. नवीन इतिहासकार जागे झाले आहेत. नवीन इतिहासकार लाँच झाले आहेत. हे इतिहासकार २५० रुपयांचे जॅकेट घालून फिरत असतात, असे गोपीचंद पडळकर यांनी म्हटले.

यावेळी पडळकर यांनी एम पीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबतही भाष्य केले. एम पीएससीमध्ये अनेक पुढारी तयार झाले आहेत. विद्यार्थ्यांनी मला जर त्यांचा विषय दिला तर मुख्यमंत्री यांच्याशी मी बोलेन. राज्य सरकारने स्पर्धा परीक्षा क्लासेसबद्दल मुद्दा गांभीर्याने घेतला पाहिजे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने शिवम ल्हार क्रांती संघटनेच्या वतीने पुण्योक ३०० या उपक्रमाच्या अंतर्गत धनगरी नाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात एकाचवेळी ५० हजार धनगरी ढोल वाजवून केले जाणार आहे. ५० हजार धनगरी ढोल वाजवून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये केली जाणार नोंद. धनगरी नाद या कार्यक्रमाचे आयोजन पुणे शहरात करण्यात येणार आहे. पुण्यातील रेसकोर्स मैदानावर या कार्यक्रमाचे करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला अजित पवार यांना नाही बोलवणार, हा कार्यक्रम राजकीय नाही, कोणाला बोलवावे हे समाजाला विचारून कळवू, असे गोपीचंद पडळकर यांनी म्हटले.

## खळबळ! उपसरपंचाचा १६ वर्षीय मुलीवर बलात्कार; गर्भवती राहिली, मुलीला जन्म देताच नराधमाने बाळ विकल्याचा संशय

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेडमध्ये एक भयंकर घटना समोर आली आहे. उपसरपंचानेच १६ वर्षाच्या अल्पवयीन तरुणीवर बलात्कार केला आहे. या घटनेनंतर अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिली होती. या घटनेने परिसरात एकच संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी आरोपी उपसरपंचाला ताब्यात घेतलं असून पुढील तपास करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीचे वय १६ वर्ष असून आरोपीचे वय ५५ वर्ष आहे. आरोपी हा गावचा उपसरपंच आहे. आरोपीने लैंगिक अत्याचार केल्यानंतर तरुणी गर्भवती राहिली होती त्यानंतर तिने नऊ महिन्यांनी मुलीला जन्म दिला. मुलीच्या जन्मानंतर आरोपीने ते बाळ विकल्याचा संशय आहे. तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ही घटना असून पोलिस त्या दिशेने तपास करत आहेत.

आरोपी बाबूराव तुपेकर याने वर्षभरापूर्वी गावातीलच एका अल्पवयीन मुलीला गुंगीच्या गोळ्या खाऊ घालून लैंगिक अत्याचार केला. मुलगी गर्भवती राहिली आणि महिनाभरपूर्वी तिची प्रसूती करण्यात आली. पिडीत मुलीने जन्म दिलेल्या बाळाला विकल्याचा संशय आहे. हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला. या प्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. आरोपी उपसरपंच बाबूराव तुपेकर याला अटक करण्यात आलीये. पुढील तपास पोलीस करताहेत.

चोपडा शहरानजीक असणाऱ्या गोरगावले रस्त्यावरील परिसरात कामासाठी आलेल्या आदिवासी सम ाजाच्या पाच वर्षातील बालिकेवर पंचवीस वर्षाच्या नराधमाने ती खेळत असताना तिला जबरदस्तीने झोपडीत नेऊन तिच्यावर अतिप्रसंग केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी सदर आरोपीला चांगलाच चोप दिला आहे. पोलिसांना या संदर्भात माहिती मिळाल्यानंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून त्याला मारहाण झाल्यामुळे उपचारासाठी चोपडा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# तेव्हा मी पायलट होतो, फडणवीस आणि अजित दादा को-पायलट; आम्ही योजनांचं टेकऑफ केलं : एकनाथ शिंदे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात २०१४ ते २०१९ दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या काळात अनेक विकास कामे झाली. मात्र मधल्या काळात अचानक आलेल्या सरकारने पुन्हा काम बंद करण्याचे काम झालं. पण २०२२ साली तुमच्या मनातलं महायुतीचं सरकार आलं, तेव्हा पुन्हा या विकासकामांना गती मिळाली. त्यामुळे अतिशय कमी वेळात आपण अमरावती येथील विमानतळाचे काम खऱ्या अर्थाने सुरू करू शकलो. महायुतीचे सरकार येण्यापूर्वी आपण पाहिलं की अनेक महत्त्वपूर्ण योजना बंद पडल्या होत्या, विकास काम ठप्प झालं होतं आणि विकास आणि कल्याणकारी योजणांचं टेक ऑफ झालं. मात्र त्यानंतर विमानाचा



पायलट मी होतो आणि को- पायलट देवेंद्र फडणवीस आणि अजित दादा होते. मात्र आता देवेंद्रजी पायलट आहे आणि आम्ही दोघे को पायालट असल्याची मिश्किल प्रतिक्रिया देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली आहे. अम रावती येथे विमानतळाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पायलटची सीट बदलली पण विकासाची गती तीच कायम आहे- एकनाथ शिंदे

पायलटची सीट बदलली तरी विकासाचा विमान हे कायम तेच आहे आणि आम्ही त्याच गतीने समोर जात आहोत. कारण आमचे इंजिन तेच आहे. असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मुंबई समृद्धी महामार्गचे लोकार्पण होतं असताना अनेकांनी या विकास कामाला विरोध केला. त्यावेळी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस होते. तर मी त्या विभागाचा मंत्री म्हणून काम पाहिलं. अनेकांनी विकास विरोधी भूमिका घेतली. मात्र आम्ही ते काम करून हा महामार्ग विकासाचा महामार्ग असल्याचे सिद्ध करून दाखवलं. असेही शिंदे म्हणाले.

त्यांना केवळ अडचणीचा पाढा पाठ होता, विकासाचा नव्हता

समृद्धी महामार्गाच्या वेळी देवेंद्र फडणवीसांची नेतृत्वात मी रस्त्यावर उतरून काम केलं आणि काम करून दखवले. मुंबईतील कोस्टल रोड असेल किंवा अटल सेतू असेल, नव्या मुंबईतील विमानतळ असेल असे अनेक विकासकामे आम्ही गेल्या अडीच वर्षाचा काळात मार्गी लावले आहे. समृद्धी महामार्गात काही लोकांनी आळमुठी भूमिका घेतली. आधी चे लोक सत्तेत होते त्यांना केवळ अडचणीचा पाढा पाठ होता, विकासाचा पाढा त्यांना पाठ नव्हता. विरोधक अफवा पसरवत आहे, पण आम्ही लाडकी बहीण योजना बंद करणार नाही. टप्याटप्यामध्ये सर्व योजना सुरू करू. पेपर मिस्टिकवालं आमचं सरकार नाही. हे डबल इंजिन सरकार आहे. गेल्या १० वर्षात ८६ विमानतळ झाली असून आगामी काळात मोदीजींच्या मार्गदर्शनात अजून काम आम्हाला करता येणार आहे. आम्हाला पालघर येथे ही नवं विमानातळ करत असल्याची घोषणा ही एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ‘महाज्ञानदीप’ ऑनलाईन पोर्टलचा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

- देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल ‘महाज्ञानदीप’ महाराष्ट्रात सुरू
- उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** डिजिटल शिक्षणाच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली असून महाज्ञानदीप'या ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधांचे लोकाभिमुखीकरण करण्यासाठी देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू झाले आहे.असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.





आज मंत्रालयात ‘महाज्ञानदीप’ पोर्टलचा शुभारंभ उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेश देवळाणकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सजीव सोनवणे, आयआयटी गांधीनगरचे प्रा. समीर सहस्त्रबुद्धे तसेच राज्यातील विविध विद्यापीठांचे कुलगुरू, कुलसचिव, प्राध्यापक, विविध विद्याशाखांचे संचालक, पत्रकार आणि अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले,‘महाज्ञानदीप’ उपक्रमांतर्गत एक हजार तज्ज्ञ प्राध्यापक घडवण्याचा संकल्प आहे. आतापर्यंत १५० प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (-२०२०) अंतर्गत भारतीय ज्ञान प्रणाली जेनेरिक हा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार केला आहे. हा अभ्यासक्रम या पोर्टलवर अपलोड करण्यात आला असून जगभरातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. या पोर्टलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण ऑनलाईन सहज एका क्लिकवर उपलब्ध होईल.

या उपक्रमामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई यांचा समावेश आहे.

## संक्षिप्त...

### नवनियुक्त तलाठ्यांच्या प्रशिक्षणाला सुरुवात ; महसूलमध्ये कर्मचाऱ्यांना एआयचेही प्रशिक्षण



**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** महसूल विभागाचे काम अधिक गतीशील करण्यासाठी नव्या दमाच्या तलाठ्यांना आता आर्टिफिशियल इंटिलिजन्स अशा नव्या तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा यासोबतच ई -फेरफार व अन्य आवश्यक बाबींचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू झाले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यामध्ये ऑनलाईन उपक्रमासंदर्भात पुढाकार घेतला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय ईफायलींगमध्ये अग्रेसित झाले आहे. त्यामुळे महसूल प्रशासनात दाखल झालेल्या नव्या १२२ तलाठ्यांच्या प्रशिक्षणामध्ये नवतंत्रज्ञानाचा महसूलमध्ये वापर संदर्भात आज दिवसभर प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, शरद वानखेडे, निळकंठ पाचंगे, संतोष निलावार यांच्यासह विविध तंत्रस्नेही अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण दिले.

### पंतप्रधान मोदींच्या हस्ते 30 एप्रिलला आंबा महोत्सवाचे उद्घाटन, दिल्लीकरांना अस्सल देवगडची चव चाखायला मिळणार





नवी दिल्ली: दिल्ली म हाराष्ट्र सदन येथे आयोजित आंबा महोत्सवाचे दिम ाखदार उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार आहे. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळा पार पडणार असून, मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र वायकर यांच्या अभिनव संकल्पनेच्या मध्यमातून दिल्ली येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आलंय. कोकणातील देवगड आणि रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात आणि देशभरात खूपच प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्यांना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी, या उदात्त हेतूने खासदार वायकर यांनी दिल्ली येथील म हाराष्ट्र सदनमध्ये ३० एप्रिल ते १ मे (महाराष्ट्र दिन) पर्यत आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे.

मुंबईतील खासदार रवींद्र वायकर यांच्याकडून आंबा महोत्सवाचे नियोजन : या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. तसेच महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येणार आहे. महोत्सवाला केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या बरोबरच देशाच्या विविध राज्यांतील खासदार आणि आमदारही उपस्थित राहणार आहेत. मुंबईतील खासदार रवींद्र वायकर यांनी आंबा महोत्सवाचे नियोजन करून या महोत्सवाचे उद्घाटन देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते व्हावे, यासाठी त्यांची भेट घेतली होती. त्यानुसार त्यांनी आंबा महोत्सवाच्या उद्घाटनास वेळ दिलीय.

अन्य उत्पादक अन् शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे : प्रत्येक राज्यातील जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या फळांना जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यांनी प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भेटीदरम्यान व्यक्त केले होते. दिल्लीतील जास्तीत जास्त आंबा प्रेमींनी या महोत्सवाला भेट देऊन कोकणातील आंबा, अन्य उत्पादकांना तसेच शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन खासदार रवींद्र वायकर यांनी केलंय.

## किनवट तालुक्यातील बॉक्सिंग खेळाडू अजय पेंदोर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित

### शुक्रवारी पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** शालेय शिक्षण व क्रीडा विभागद्वारा आयोजीत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ सन २०२२-२३ व सन २०२३-२४ चा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वा. शिवछत्रपती क्रीडा संकुल (बॅडमिंटन हॉल) म्हाळुंगे-बालेवाडी पुणे येथे संपन्न होणार आहे. या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ करीता जिल्हयातील खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.



किनवट तालुक्यातील अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग खेळाडू) यांच्या कामगीरीची दखल घेवून महाराष्ट्र शासनामार्फत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ ने अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडूं) यांना ३ लाख रुपये रोख, स्नमानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे. ही बाब किनवट तालुक्याची, संपूर्ण जिल्ह्याची, महाराष्ट्र व देशाकरीता गौरवाची आहे.

अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग खेळाडू) हे ८९ वी इलाईट पुरुष महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा सन २०१९-२० (अकोला)- सुवर्ण पदक, ९० वी ईलाईट पुरुष महाराष्ट्र राज्य बॉक्सींग अजिंक्यपद स्पर्धा सन २०२३ (बुलढाणा)- सुवर्ण पदक, ७७ वी युथ मुले महाराष्ट्र राज्य बॉक्सींग अजिंक्यपद स्पर्धा सन २०१८ (सातारा)- सुवर्ण पदक, ४ वी ईलाईट पुरुष राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिप सन २०१९ (हिमाचल प्रदेश)- रौप्य पदक, ५ वी ईलाईट पुरुष राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिप सन २०२१ (कर्नाटका)- कांस्य पदक, ऑल इंडिया आंतर विद्यापीठ चॅम्पियनशिप सन २०१९ (उदयपूर, राजस्थान)- रोप्य पदक (बेस्ट चॅलेंजर), खेलो इंडिया युथ गेम्स (पुणे, महाराष्ट्र) सन २०१९- रोप्य पदक, ६३ वी राष्ट्रीय शालेय बॉक्सींग क्रीडा स्पर्धा २०१७-१८ (१९ वर्षे मुले)- सुवर्ण पदक (बेस्ट बॉक्सर), ५८ वी राष्ट्रीय शालेय बॉक्सींग क्रीडा स्पर्धा २०१२-१३ (१४ वर्षे मुले) मध्य प्रदेश- सुवर्ण पदक, ५७ वी राष्ट्रीय शालेय बॉक्सींग क्रीडा स्पर्धा २०११-१२ (१४ वर्षे मुले) दिल्ली- सुवर्ण पदक, ५९ वी राष्ट्रीय शालेय बॉक्सींग क्रीडा स्पर्धा २०१३-१४ (१४ वर्षे मुले) भटींडा (पंजाब)- रोप्य पदक व इतर असी महत्वाची कामगीरी केली असुन त्यांना सतिषचंद्र भट (राज्य क्रीडा मार्गदर्शक, अकोला) यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले असून सद्यस्थितीत ते अकोला येथे प्रशिक्षण घेत असून भारतीय रेल्वे विभाग मध्ये नौकरीस आहेत.

अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडूं) यांचे जिल्हयात सर्वत्र कौतुक होत असून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी व जिल्हयातील विविध एकविध खेळसंघटनेचे पदाधिकारी, मार्गदर्शक, प्रशिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कार्यालयातील क्रीडा अधिकारी संजय बेतीवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक बालाजी शिरसीकर, सी. आर. होनवडजकर, श्रीमती शिवकांता देशमुख, क्रीडा अधिकारी राहुल श्रीरामवार, विपूल दापके, वरिष्ठ लिपिक संतोष कनकावार, कनिष्ठ लिपीक दत्तकुमार धुतडे, संजय चव्हाण आदि उपस्थित होते.

### खुशखबर! झहीर खान-सागरिका घाटगे यांना पुत्ररत्न, नाव पण जाहीर केलं

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचा माजी क्रिकेटर झहीर खान आणि अभिनेत्री सागरिका घाटगे यांनी चाहत्यांना खुशखबर दिली आहे. झहीर -सागरिका आई-बाबा झाले असून त्यांच्या घरी चिमुकल्या पाहुण्याचं आगमन झालं आहे. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत दोघांनी सर्वांसोबत ही गोड बातमी शेअर केली आहे. जहीर-सागरिकाला मुलगा झाला असून त्या तिघांचा एक खास फोटो पोस्ट करत मुलाचं नावही त्यांनी जाहीर केलं आहे.

सागरिकाने बाळाची पहिली झलक दाखवत एक फोटो इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन शेअर केला आहे. यामध्ये तिने बाळाचं नावंही सांगितलं आहे. 'प्रेम, कृतज्ञता आणि दैवी आशीर्वादासह आम्ही आमच्या मुलाचे, फतेहसिंह खान याचे स्वागत करत आहोत.' असं सागरिकाने पोस्टमध्ये म्हटलं आहे. सागरिकाच्या या पोस्टवर कमेंट करत चाहत्यांनी आणि सेलिब्रिटींनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहे.

ब्लॅक अँड व्हाईटमध्ये २ फोटोंसह अशी कॅप्शन लिहीत त्यांनी मुलाचं नाव सर्वाना सांगितलं आहे. एका पोस्टमध्ये सागरिका-झहीर आणि त्याच्या कुशीत झोपलेला लेक दिसत आहे. तर दुसऱ्या फोटोमध्ये नवजात बाळाचं बोट पकडलेला क्लोज अप फोटो शेअर केला आहे. त्यांच्या या पोस्टवर आणि फोटोवर लाईक्सचा वर्षाव होत असून अनेकांनी कमेंटसमध्ये त्यांचं अभिनंदन करत लहान बाळालाही आशिर्वाद दिले आहेत.

जहीर खान सध्या आयपीएल २०२५ मध्ये व्यस्त आहे. या सीझनमध्ये तो लखनऊ सुपर जायंट्स चा बॉलिंग कोच आहे. आयपीएलमध्ये लखनऊने आत्तापर्यंत ७ सामने खेळले असून त्यापैकी ४ जिंकले तर ३ हरले. सध्या पॉईंट्स टेबलमध्ये झहीर खानची टीम ५ व्या स्थानी आहे. आयपीएल २०२५ मधील पुढील सामना १९ एप्रिल रोजी लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला जाईल.

अभिनेत्री सागरिकाने २०१७ मध्ये क्रिकेटर असलेल्या झहीर खानशी लग्न करत नव्या आयुष्याला सुरुवात केली होती. लग्नानंतर ८ वर्षांनी त्यांच्या घरात पाळणा हलला आहे. ३९व्या वर्षी सागरिका पहिल्यांदा आई झाली आहे. त्यांच्या घरी नव्या पाहुण्याचं आगमन झालं आहे.

### अमेरिकेत आयात होणाऱ्या चिनी मालावर आता २४५ टक्के आयात शुल्क लागू

वॉशिंग्टन : अमेरिकेत आयात होणाऱ्या चिनी मालावर आता २४५ टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लागू होणार आहे. इतर देशांवर वाढीव आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय अमेरिकेने स्थगित केला आहे. यामुळे चीनमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या किंमतीत आता प्रचंड वाढ होणार आत. या उलट इतर देशांतून आयात होणाऱ्या वस्तूंवर तुलनेत कमी आयात शुल्क असेल. यामुळे चिनी वस्तू आणि सेवा अमेरिकेत महाग होणार आहे. याचा चिनी मालाच्या खरेदीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. चिनी मालाच्या खरेदीत घट होण्याची तसेच चिनी मालाला असलेली अमेरिकेतली मागणीच कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

अमेरिकेने सुधारित आयात शुल्क (टॅरिफ) धोरण जाहीर केले. यानंतर भारतासह अनेक देशांनी आयात शुल्क या मुद्यावर अमेरिकेशी बातमीत करण्याची तयारी दाखवली. यामुळे अमेरिकेने संबंधित देशांवरील वाढीव आयात शुल्काचा निर्णय स्थगित केला. पण चीनने अमेरिकेच्या सुधारित आयात शुल्क (टॅरिफ) धोरणाला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेच्या चीनमध्ये आयात होणाऱ्या मालावर (वस्तू आणि सेवा) वाढीव आयात शुल्क लागू केले. या निर्णयाचे पडसाद उमटले. अमेरिकेने चिनी मालावर एकूण २४५ टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लागू होईल, असे जाहीर केले. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्वाक्षरीने नवा आदेश जारी झाला.

## सई ताम्हणकर म्हणतेय, आलेच मी...; देवमाणूसमध्ये लटक्या-झटक्यांनी गाजवणार लावणीचा फड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी चित्रपटसृष्टीत आता उत्साह आणि सौंदर्याची लाट उसळणार आहे, कारण सगळ्यांची लाडकी अभिनेत्री सई ताम्हणकर देवमाणूस या बहुप्रतिक्षित चित्रपटात आलेच मी म्हणत पहिल्यांदाच शानदार लावणीवर थिरकणार आहे. हा चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

लव फिल्म्सच्या लव रंजन आणि अंकुर गर्ग यांची निर्मिती असलेला आणि तेजस देऊस्कर दिग्दर्शित या चित्रपटात महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

विविधांगी भूमिका साकारून आपली छाप पाडणारी सई, आलेच मी या गाण्यातून एका वेगळ्याच अविष्कारात प्रेक्षकांसमोर येत आहे. पारंपरिक मराठी संगीतसृष्टीत आपली खास ओळख असणाऱ्या बेला शेंडे यांच्या दमदार आवाजात हे गीत साकारण्यात आले असून रोहन प्रधान यांनी त्यांना साथ दिली आहे. रोहन-रोहन यांचे संगीत लाभलेले हे गाणे तेजस देऊस्कर यांनी लिहिले असून रोहन गोखले यांनीही अतिरिक्त गीतलेखन केले आहे. सुप्रसिद्ध लावणी तज्ज्ञ आशीष पाटील यांनी या गाण्याची नृत्यरचना केली आहे, जी अत्यंत जोशपूर्ण आणि सुरेख आहे.

देवमाणूसमधल्या या भूमिकेसाठी सईने तब्बल ३३ तासांपेक्षा अधिक वेळ सरावाला दिला, लावणीच्या प्रत्येक नजाकतीत ती पूर्णपणे रमली आणि एक धमाकेदार परफॉर्मन्स तिने सादर केला आहे. आपल्या अनुभवाबद्दल सई म्हणते, ‘‘देवमाणूसमध्ये लावणी करणे हा एक विलक्षण अनुभव होता. हा माझा एक नवीन प्रयत्न होता आणि मला खूप मजा आली. गाणे ऐकताच माझ्या पायाखालची जमीन हलली. लव फिल्म्स आणि तेजस यांनी मला या भूमिकेसाठी निवडले, याबद्दल मी खूप आभारी आहे. आशीषच्या मार्गदर्शनाशिवाय इतकी प्रभावी लावणी साकारता आलीच नसती. प्रेक्षकांना माझे हे नवं रूप आवडेल, अशी आशा आहे!’’



आलेच मी हे गाणे त्याच्या भन्नाट बीट्स, आकर्षक सादरीकरण आणि सईच्या जबरदस्त उपस्थितीमुळे लवकरच टॉप लिस्टमध्ये झळकण्यास सज्ज आहे. लव फिल्म्स प्रस्तुत, तेजस प्रभा विजय देऊस्कर दिग्दर्शित आणि लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित देवमाणूस २५ एप्रिल २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# मनमानी न करता जनतेचे मत विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागेल

## आमदार सिद्धार्थ खरात यांचे खडेबोल : तुघलकी कारभार चालणार नाही

## प्रकार न थांबल्यास सर्वांना रस्त्यावर आणल्या शिवाय राहणार नाही : आमदार खरात



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी : मेहकर शहरांमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली असली तरी, सदर अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये भेदभाव केला जात आहे. इशाऱ्यावर प्रशासन कारवाई करत आहे.मात्र, हा तुघलकी कारभार चालणार नाही. जनतेचे मत विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागेल. अन्यथा मी सर्वांना रस्त्यावर आणल्याशिवाय राहणार नाही, इशारा आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला. शहरातील अतिक्रमण हटाव मोहीमेसंदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर अध्यक्ष किशोर गारोळे व इतर व्यवसायिकांनी सुरू केलेल्या साखळी उपोषणा भेटी प्रसंगी ते बोलत होते.**

मेहकर : यावेळी ते म्हणाले की, सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. परंतु, नंतर असे लक्षात आले आहे की, अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये भेदभाव सुरू आहे. दोन ते तीन फुटाच्या जागेवर कुटुंबाचा उदरनिर्वाह अतिक्रमणधारक करीत होते. परंतु, त्यांच्या त्यांच्या अतिक्रमण हटविण्यात आले आहे .जानेफळ रस्त्याचा १०० फुटाचा रस्ता आहे. मात्र, त्यापुढेही जात १२ फूट अतिक्रमण काढले जात आहे. काहींचे यामध्ये काहींच्या अतिक्रमण काढले जाणार आहे तर, काहींचे अतिक्रमण ठेवले जाणार आहे. तर हा जो डावा उजवा खेळ सुरू आहे.तो थांबला पाहिजे, डोणगावचा जो सर्विस रोड आहे. त्यामध्ये लेआउट, नझुल, काही गुंठेवारी आदीप्रमाणे जागेची खरेदी खत झालेली



आहे.नगरपरिषदेने टॅक्स घेतला आहे.मात्र, काहींच्या घरात मोजमाप गेली आहे. गावठाणमध्ये तुघलकी कार्यक्रम सुरू आहे. आता गावठाणच्या निर्णयाप्रमाणे तीस ते पस्तीस फुटापर्यंत अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. मूळ मुद्दा जिजाऊ चौक ते वाटिका पर्यंत असून तीन- तीन फूट जागेवर अतिक्रमण करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला जात होता आजुबाजुला जायला मार्ग नाही, तोच खरा बेल्ट होता.१९६० च्या जमिनी कायद्याप्रमाणे आहे. हा अनागोंदी कारभार सुरू आहे. त्याला विरोध करण्यासाठी शिवसेना शहर प्रमुख किशोर गारोळे व शहरातील अतिक्रमणधारकांनी मेहकर नगरपरिषद कार्यालयासमोर सकाळी उपोषण सुरू केलेले आहे. त्याला आमचा पाठिंबा असून मनमानी कारभार चालणार नाही. या शहराचा मी भाग्यविधाता आहे. लोकांचे मत घेऊन निर्णय घ्यावा लागेल. अन्यथा मी सर्वांना आवाहन करतो व आव्हानही देतो की हा सर्व प्रकार न थांबल्यास सर्वांना रस्त्यावर आणल्या शिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.

## विविध वृत्त...

### शाळकरी मुलासोबत अनैसर्गिक कृत्य

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** एक १४ वर्षीय शाळकरी मुलासोबत एका २२ वर्षीय तरुणाने अनैसर्गिक कृत्य



केल्याची घटना काल दिनांक १५ एप्रिल रोजी कंकरवाडी येथे संध्याकाळी साडेपाच वाजता घडली. महेश देविदास जायभाये वय २२ वर्ष असे आरोपीचे नाव असून त्यास रिसोड पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत रिसोड पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रिसोड तालुक्यातील एका १४ वर्षीय शाळकरी मुलाने पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की तो दिनांक १५ एप्रिल रोजी हळद वेचणीसाठी शेतामध्ये गेला होता. यादरम्यान पाणी आणण्यासाठी एका विहिरीवर जात असताना आरोपी महेश जायभाये याने त्याला उचलून दादरिच्या शेतात घेऊन गेला व त्याच्यासोबत अनैसर्गिक संभोग केला. सदर घटने ची माहिती मिळाल्यानंतर अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांनी रिसोड येथे पोलीस स्टेशनला भेट देऊन प्रकरणाची माहिती जाणून घेतली. याप्रकरणी रिसोड पोलीसांनी कलम ९६, ३५१ ,(२) बी एन एस ४ (२) बाल लैंगिक अत्याचार 2012, 3(1)(w) (i) 3(1) ( w) (ii) 3(2)(va) अनुसूचित जाती अनुसूचित जमाती १९८९ नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल हे करीत आहेत.

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यात १७ एप्रिलच्या सकाळी ६ वाजेपासून ते १ मे २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १७ एप्रिल सकाळी ६ वाजेपासून ते १ मे २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील.


त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

## आम्ही अतिक्रमणधारकांसोबत आहोत, त्यांना ना नफा ना तोटा तत्त्वावर गाळे उपलब्ध करून दिल्या जातील

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर शहरांमध्ये नगरपरिषद, महसूल, एमएसआरडीसी अशा वेगवेगळ्या विभागाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे.यामध्ये अनेक गोरगरीब व अतिक्रमण करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्यांचे दुकाने उठवल्या गेली असली तरी आम्ही अतिक्रमण धारकांसोबत आहोत. त्यांना ना नफा, ना तोटा या तत्त्वावर गाळे उपलब्ध करून दिल्या जातील.अशी माहिती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, नगरपरिषद प्रशासन, महसूल प्रशासन, एमएसआरडीसी



अशा वेगवेगळ्या विभागाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. मात्र, अतिरिक्त अतिक्रमण धारकांना मी आश्वासित करतो की, शहरात शासकीय जागा आहेत. तिथे दुकाने उभे करून बुलढाणा प्रमाणे त्यांना ना नफा, ना तोटा या तत्त्वावर दिले जातील. काही काळापूर्वी बुलढाणा शहरांमध्ये सुद्धा अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली होती. यावेळी साडेतीनशे ते चारशे दुकाने उठवण्यात आली. त्या अतिक्रमणधारकांना बुलढाणा अर्बन क्रेडिट सोसायटी व महाराष्ट्र अर्बन क्रेडिट सोसायटीच्या वतीने ना नफा, ना तोटा तत्त्वावर गाळे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आपली सर्वांची इच्छा असेल तर मेहकर शहरातील शासकीय जागेवर बुलढाणा प्रमाणे गाळे बांधून दिले जातील.यातील गरीब व्यावसायिकांना बँकेचे कर्ज सुद्धा उपलब्ध करून दिले जाईल. त्यामुळे अतिक्रमणधारकांनी घाबरण्याची गरज नाही. शासनाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम युद्ध पातळीवर राबविली जात आहे. मात्र, विस्थापित झालेल्या दुकानदारांनी आमच्याकडे इच्छा व्यक्त करावी, त्यांना नफा ना, तोटा या तत्वावर मेहकर शहरातील शासकीय जागेवर महाराष्ट्र क्रेडिट सोसायटीच्या वतीने गाळे बांधून दिली जातील. अशी माहिती यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बोलताना दिली आहे.

### राज्यसेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याच्या मागणीसाठी एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यसेवा मुख्य परीक्षा ४५ दिवस पुढे ढकलावी आणि कम्बाईन परीक्षेच्या पीएसआय, एसटीआय, एएसओ, एसआर या पदांमध्ये वाढ करण्यात यावी, या मागणीसाठी आज एमपीएससी विद्यार्थ्यांकडून जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन सुरू करण्यात आलंय. पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालय येथे एमपीएससी विद्यार्थ्यांकडून या मागणीसाठी आंदोलन करण्यात येत असून, या आंदोलनाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या (राज्यसेवा) निकालातील गोंधळ आणि प्रक्रियेमधील पारदर्शकतेच्या अभावामुळे विद्यार्थी हे नाराज झाले असून, आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येत आहे.

## मुंबई – अमरावती प्रवासी विमान वाहतूक सुरु, आता मुंबई ते अमरावती फक्त दोन तास

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** मुंबई – अमरावती प्रवासी विमान वाहतूक सुरू झाली आहे. पहिले प्रवासी विमान म्हणून अलायन्स एअर कंपनीच्या ९६६३३ या विमानाने मुंबईतून उड्डाण केले. हे विमान अमरावती विमानतळावर उतरले. अमरावती विमानतळावर आगमन झालेल्या पहिल्या प्रवासी विमानावर जलतोरण उभारण्यात आले. विमानाला पाण्याची सलामी देण्यात आली.

आता मुंबई – अमरावती प्रवासी विमान वाहतुकीमुळे अमरावतीसह विदर्भाच्या नव्या विकासपर्वाला सुरुवात झाली आहे; असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. याआधी अलायन्स एअर कंपनीच्या ९६६३३ या विमानातून मुंबई – अमरावती असा प्रवास करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार नागरी विमान वाहतूक खात्याचे राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीष महाजन आणि वरिष्ठ सरकारी अधिकारी तसेच मान्यवर यांचे अमरावती विमानतळावर आगमन झाले.

अमरावती विमानतळावर उतरल्यानंतर मुख्यमंत्री आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी थोडा वेळ बातचीत केली. यानंतर माजी खासदार नवनीत राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एक छोटा व्हिडीओ केला आणि तो सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केला. नवनीत राणा यांनी इतर प्रवाशांसोबत काढलेले फोटो आणि व्हिडीओ पण सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले. विमान वाहतुकीमुळे विकासाला चालना मिळेल, असे त्या म्हणाल्या.

विमानामुळे मुंबई ते अमरावती हा प्रवास फक्त दोन तासांत होणार आहे. तसेच समृद्धी महामार्गामुळे मुंबई ते नागपूर हा प्रवास सहा तासांवर आला आहे. लवकरच अमरावती येथे वैमानिक प्रशिक्षण केंद्र पण सुरू होत आहे. यामुळे अमरावतीतून देशाला नवे वैमानिक आणि प्रशिक्षक मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

असे आहे अमरावती विमानतळ

अमरावती विमानतळाच्या धावपट्टीची लांबी १८५० मीटर असून रुंदी ४५ मीटर इतकी आहे.

आशियातील सर्वात मोठे एअर इंडियाचे वैमानिक प्रशिक्षण केंद्र अमरावती विमानतळावर उभारले जाणार आहे.

अमरावती विमानतळावर एकाच वेळी एटीआर७२ सीटर अशी दोन विमाने उभी केली (पार्क) जाऊ शकतात.

ऑक्टोबर २०२५ मध्ये अमरावती विमानतळावर नाईट लँडिंग सुरू होणार आहे.

अमरावती विमानतळाला संत गुलाबराव महाराज यांचे नाव देण्यात आले आहे.

## आठवणीत रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते. निमित्त होते केशवनगर येथील बाबासाहेब धाबेकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे. २००३-०४ या वर्षात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा रविवार रोजी केशवनगर येथील बाबासाहेब धाबेकर महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.



### माजी विद्यार्थ्यांची २१ वर्षांनी पुन्हा भरली शाळा

बाबासाहेब धाबेकर महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. शाळेतील माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांचे स्वागत करण्यात आले. बाबासाहेब धाबेकर विद्यालय केशवनगर तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथे २००३ -२००४ या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यात माजी विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य आश्रुजी आखाडे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये मा.दत्तात्रय काळे.तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य कैलास साबळे, प्राचार्य विश्वनाथ सांगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते

मा.प्राचार्य राजकुमार बोनकिले, सुनील जगताप सर, कृष्णकांत इंगोले, पांडुरंग खंदारे, ज्ञानेश्वर देशमुख, सोपानराव कोरडे, विजय पालवे इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते अतिशय उत्साहात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा पार पडला

याप्रसंगी शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षकांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन पंकज देशमुख यांनी, प्रास्ताविक सोनिया गायकवाड हिने तर आभार प्रदर्शन प्रवीण आखाडे यांनी केलेयासाठी कार्यक्रम यशस्वीरित्या राबवण्यासाठी विठ्ठल मांदळकर, प्रविण आखाडे, महेश देवगिरकर, सोनिया गायकवाड संदीप जाधव व पंकज देशमुख यांनी परिश्रम घेतले.